शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद,नागाळा पार्क, कोल्हापूर

जा.क्र.कोजिप/शिक्षण/कावि-२/४२५/२०२४. दिनांक :- २८/०३/२०२४.

फोन-(०२३१) २६५०७८१ Email- ssakolhapur१@gmail.com

वाचले:-

१) महाराष्ट्र नागरी(सेवा जेष्ठतेचे विनियम) नियम १९८२

२) कार्यासन अधिकारी, ग्राम विकास विभाग यांचेकडील शासन परिपत्रक दिनांक २८ जानेवारी १९८६

३) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्र.एसआरव्ही.२०११/प्रक्र. ८४४/ १२ दिनांक :- २१/१०/२०११.

४) मा.मु.का.अ, जि.प.कोल्हापूर यांचेकडील अधिकार प्रदान आदेश दिनांक:१६/९/२०११ मधील नियम-८१.

५) मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.), जिल्हा परिषद कोल्हापूर यांचेकडील आदेश जा.क्र.कोजिप/ शिक्षण/प्राथ/वशि३/२०१८, दिनांक १०.०४.२०१८

६) कार्यालयीन मंजूर टिपणी दिनांक: २८/०३/२०२४

## आ दे श

प्राथमिक शिक्षक संवर्गाची सेवाजेष्ठतासुची दर सहा वर्षानी संदर्भ क्रमांक २ अन्वये प्रसिध्द करणे आवश्यक आहे. त्यानुसार प्राथमिक शिक्षक संवर्गाची दिनांक १.१.२०१८ रोजीची अंतिम जेष्ठतासुची संदर्भ क्रमांक ४ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेली होती. सदर यादीस सहा वर्षाचा कालावधी पूर्ण झालेने प्राथमिक शिक्षक संवर्गाची संभाव्य जेष्ठतायादी प्रसिध्द करणे आवश्यक आहे. त्यानुसार या विभागाकडील प्राथमिक शिक्षक संवर्गाची दिनांक ०१/०१/२०२४ ची संभाव्य जेष्ठता यादी यासोबत प्राथमिक शिक्षकांच्या हरकती घेणेसाठी प्रसिध्द करण्यात येत आहे. सदरची यादी सर्व प्राथमिक शिक्षकांचे निदर्शनास आणावी व त्याबाबत काही हरकती / दुरुस्ती असल्यास त्या संबंधित कार्यालय प्रमुखाचे मार्फत मुळ सेवापुस्तकावरुन पडताळणी करुन दिनांक ३०.०४.२०२४ पर्यंत हरकती / दुरुस्ती आवश्यक त्या अभिलेखासह या कार्यालयाकडे सादर करण्यात याव्यात. हरकती/दुरुस्ती घेताना संबंधित शिक्षकाचे अर्जावर जेष्ठतासुची मधील अ.क्र. नमुद करण्यात यावा. पुराव्यानिशी हरकती / दुरुस्ती या कार्यालयाकडे विहित मुदतीत प्राप्त न झाल्यास आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती /दुरुस्ती बाबतचा विचार केला जाणार नाही याची सर्व संबंधित प्राथमिक शिक्षकांना पुर्व सुचना देणेत यावी. जेणेकरुन संबंधिताचे सेवाजेष्ठता यादीमध्ये तसा बदल करणे सुकर होईल.

तसेच सदर जेष्ठतायादीमध्ये प्राथमिक शिक्षक यांची पदोन्नती, जिल्हा बदली, सेवानिवृत्त, मयत झाले असल्यास तसे त्याचे नावासमोर नमुद करण्यात यावे. संबंधिताची माहिती १ ते ३७ कॅालममध्ये भरण्यात आली असल्यामुळे संबंधिताना सदर सर्व कॅालम मधील माहिती तपासुन शेरा कॉलममध्ये त्यांची स्वाक्षरी घेवून त्याची प्रत आपले दप्तरी जतन करुन ठेवण्यात यावी. याबाबत जेष्ठतायादी संबंधित प्राथमिक शिक्षकांचे निदर्शनास न आणलेस व याबाबत भविष्यात तक्रार उद्‌भवल्यास याची सर्वस्वी जबाबदारी आपले कार्यालयाची राहील याची नोंद घेण्यात यावी.

प्राथमिक शिक्षकांची संभाव्य जेष्ठतासुची जिल्हा परिषद कोल्हापूरकडील www.zpkolhapur.gov.in या वेबसाईड वर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. याबाबत संबंधित पदवीधर अध्यापक / अध्यापक यांचे निदर्शनास आणण्यात यावी.

( मीना शेंडकर )
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद,कोल्हापूर

सोबत - संभाव्य जेष्ठतासुची दि.१.१.२०२४

प्रति-

गट शिक्षण अधिकारी,
पंचायत समिती,...........सर्व

## दाखला

दाखला देणेत येतो की ------------------------या संवर्गाकडील दिनांक १.१.२०२४ ची संभाव्य जेष्ठता यादी या कार्यालयाकडे कार्यरत असलेले सर्व प्राथमिक शिक्षकांचे निदर्शनास आणली आहे. ज्या कर्मचा-यांची हरकत आहे अशा कर्मचाऱ्यांची लेखी हरकत आवश्यक त्या कागदपत्रासह सोबत सादर केली आहे. त्याव्यतिरिक्त सदर जेष्ठता यादीबाबत कोणत्याही कर्मचाऱ्याची कोणत्याही स्वरुपाची हरकत नाही..

गट शिक्षण अधिकारी,
पंचायत समिती ——

Scanned with CamScanner